# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०८/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

### अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दिनांक ०१/०८/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय बातमीदारा कडून माहिती मिळाली की, उमरेड शहरातील इतवारीपेठ येथे ताज बिर्यानी सेंटर नावाच्या हॉटेलमध्ये अवैधरीत्या देशी दारू बाळगुन हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना खाण्यापिण्याची सोय उपलब्ध करून देशी दारू विक्री होत आहे. अशा मिळालेल्या माहितीचे आधारे नमुद घटनास्थळी रेड कारवाई करून **आरोपी नामे— १) प्रिन्स श्रीकृष्ण जुगनाके रा. उमरेड २) आकाश गगाधार उरकुडे रा उमरेड ३) विशाल दिलीप सहारे रा उमरेड ४) सादिक /अड्डु उस्मान शेख रा उमरेड** यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन १) देशी दारू १८० ml चे २७ नग किंमती १८९०/—रू. २) देशी दारू ९० ml चे २१ नग किंमती ७३५/—रू. ३) रोख रक्कम १००१०/—रू. असा एकूण १२६७५/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमाल, आरोपी यांना पुढील कायदेशीर कारवाई कामी पोलीस स्टेशन उमरेडचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी किशोर शेरकी, HC अरविंद भगत, HC गजेंद्र चौधरी, HC दिनेश आधापुरे, HC संजय बांते, DHC अमोल कुथे यांनी पार पाडली.

### अवैध दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक ०१/०८/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा वराडा वार्ड क्र. ०१ येथे राहणारा बबन धोटे हा आपले राहते घराचे बाजूला असलेल्या झोपडयात देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा माहिती वरून रेड कारवाई करून **आरोपी नामे— बबन गूलाबराव धोटे, वय ६५ वर्ष, रा. वराडा वार्ड क्र. ०१** याचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता घराला लागुन असलेल्या झोपडीची पाहणी केली असता झोपडीत एका प्लास्टिक खुर्चीवर काळया रंगाच्या कापडी पिशवीत १८ निपा देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या सिल १८० एम. एल. च्या प्रत्येकी किंमती ७०/— रू. प्रमाणे १२६०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोहवा सचिन वेळेकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर